# प्रकरण - सहावे

## सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

## प्रकरण सहावे

## सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

६.१ प्रास्ताविक

६.२ सारांश

६.२.अ समस्याकथन

ब संशोधनाची उद्दिष्टे

क परिकल्पना

ड संशोधनाची व्याप्ती

इ संशोधनाच्या मर्यादा

६.३ संशोधनाची कार्यपद्धती

१ संशोधन पद्धती

२ अभिवृत्ती मापन कसोटी तयार करणे

३ नमुना

६.४ संकलित माहितीचे पृथ्थकरण आणि अर्थनिर्वचन

६.५ निष्कर्ष

६.६ परिकल्पनांची तपासणी

६.७ सूचना आणि शिफारशी

६.८ पुढील संशोधनार्थ विषय

## प्रकरण - सहावे

## सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

### ६.१ प्रास्ताविक

संकलित माहितीचे पृथ्थकरण आणि अर्थनिर्वचन केल्यानंतर संशोधिकेने सदर संशोधनातून संख्याशास्त्रीय पध्दतीचा अवलंब करुन आणि आलेखावरुन निष्कर्ष काढले आहेत. प्रकरण क्रमांक सहामध्ये संशोधिकेने पुन्हा एकदा संपूर्ण संशोधन प्रक्रियेचे थोडक्यात विवरण दिलेले आहे. त्यानंतर गटानुसार निष्कर्ष काढलेले आहेत व परिकल्पनांची तपासणी केली आहे. नंतर त्यानुसार पुढील संशोधनासाठी शिफारशी दिलेल्या आहेत.

### ६.२ सारांश

#### ६.२.अ] समस्याकथन

"तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांचा मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास."

#### ६.२.ब] संशोधनाची उद्दिष्टे

१] तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

२] पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका यांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

३] जास्त अध्यापन अनुभव असणा-या आणि कमी अध्यापन अनुभव असणा-या शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४] अमागासवर्गीय आणि मागासवर्गीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

५] हिंदूधर्मीय आणि बिगर हिंदू धर्मीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अ तुलनात्मक अभ्यास करणे.

६.२.क] <u>परिकल्पना</u> : सदर संशोधनात संशोधिकेने शून्य परिकल्पना मांडल्या आहेत.

१] तुळजापूर तालुक्यातील स्त्री शिक्षिका आणि पुरुष शिक्षक यांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्य शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनामध्ये फरक दिसून येत नाही.

२] तुळजापूर तालुक्यातील अमागासवर्गीय आणि मागासवर्गीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येत नाही.

३] तुळजापूर तालुक्यातील हिंदू धर्मीय आणि बिगर हिंदू धर्मीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येत नाही.

४] तुळजापूर तालुक्यातील जास्त अध्यापन अनुभव असणा-या आणि कमी अध्यापन अनुभव असणा-या शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येत नाही.

## ६. २. ड] संशोधनाची व्याप्ती

१] सदर संशोधनात संशोधिकेने केवळ तुळजापूर व शहरातीलच नव्हे तर तुळजापूर तालुक्यातील शिक्षकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास केला आहे.

२] सदर संशोधनात संशोधिकेने केवळ पुरुष शिक्षकांच नव्हे तर स्त्री शिक्षिकांचा देखील विचार केलेला आहे आणि त्यांच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

३] सदर संशोधनात उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील इयत्ता पाचवी ते दहावी पर्यन्तचे वर्ग असणाऱ्या अनुदानित आणि विनाअनुदानित मराठी माध्यमांच्या शाळेतील शिक्षकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास केला आहे.

४] सदर संशोधनात केवळ हिंदु धर्मीय शिक्षकांचा समावेश न करता इतर धर्मीय शिक्षकांचाही विचार करण्यात आला आहे आणि त्यांच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

५] सदर संशोधनात फक्त जिल्हापरिषद माध्यमिक शाळांचाच समावेश न करता नगरपरिषद शाळा, खाजगी शाळा, केंद्रिय शाळा, तसेच नवोदय विद्यालय आणि सैनिक शाळांचा देखिल समावेश केलेला आहे.

६] सदर संशोधनात अमागासवर्गीय आणि मागासवर्गीय शिक्षकांचा समावेश केलेला आहे आणि त्यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

७] सदर संशोधनात मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांत शिकविणाऱ्या सर्व विषयाच्या शिक्षकांचा समावेश केलेला असून यात क्रिडा शिक्षक, संगीत शिक्षक, चित्रकला शिक्षक, कार्यानुभव शिक्षक इत्यादींचा देखिल समावेश केलेला आहे.

८] सदर संशोधनात केवळ जास्त अध्यापन अनुभव असणाऱ्या शिक्षकांचा समावेश न करता कमी अध्यापन अनुभव असणाऱ्या शिक्षकांचा देखिल

समावेश केलेला आहे आणि त्यांचा तुलनात्मक अभ्यास क्रेह केला आहे.

६.२.३] संशोधनाच्या मर्यादा

१] सदर संशोधनात मराठी माध्यमिक शाळांव्यतिरिक्त इतर माध्यमांच्या माध्यमिक शाळांचा विचार केलेला नाही.

२] सदर संशोधनात विद्यार्थ्यांचा विचार केलेला नाही.

३] सदर संशोधनात संशोधिकेने विद्यार्थ्यांच्या पालकांचा समावेश केलेला नाही.

४] सदर संशोधनात माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांचा मुख्याध्यापक म्हणून विचार न करता शिक्षक म्हणून विचार केलेला आहे.

५] सदर संशोधनात माध्यमिक शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास केलेला आहे परंतु त्यांचा तसा दृष्टीकोन का आहे याबाबत कारणमीमांसा केलेली नाही.

६] सदर संशोधनात केंद्रिय उच्च शिक्षण मंडळाकडून चालविल्या जाणाऱ्या शिक्षकांचा समावेश केलेला नाही.

६.३ संशोधनाची कार्यपद्धती

१] संशोधन पद्धती :

सदर संशोधनाचा मुख्य हेतु हा तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे हा असल्यामुळे याकरता अभिवृत्ती मापन कसोटी तयार केली. संशोधिकेने सदर संशोधनाकरता वर्णनात्मक संशोधन पद्धतीमधील शालेय सर्वेक्षण पद्धतीची निवड केली आहे. शालेय सर्वेक्षण पद्धतीमधील सर्वेक्षण परिक्षण प्रकाराची निवड केली आहे.

२] अभिवृत्ती मापन कसोटी तयार करणे

अभिवृत्ती मापन कसोटी तयार करण्याकरता विविध तंत्राचा वापर केला जातो ती पुढीलप्रमाणे -

अ] थर्स्टन अभिवृत्ती मापन तंत्र

ब] लिकर्ट अभिवृत्ती मापन तंत्र

क] गटमन अभिवृत्ती मापन तंत्र

ड] सामाजिक अंतर मापन श्रेणी

वरील विविध तंत्रापैकी संशोधिकेने थर्स्टन अभिवृत्ती मापन तंत्राची निवड केली आहे.

थर्स्टनच्या अभिवृत्ती मापन तंत्रानुसार अभिवृत्ती मापिका कसोटी तयार करण्याच्या पध्दतीत अनेक पाय-यांचा समावेश आहे, त्या पुढीलप्रमाणे -

१. मूल्यशिक्षण विषयासंबंधीची विधाने गोळा करणे. ही विधाने गोळा करताना ती प्रासंगिक आणि समर्पक असतील इकडे लक्ष दिले.
२. गोळा केलेली विधाने संकलित आणि संपादित केली.
३. मूल्यशिक्षण विषयातील तज्ज्ञ व्यक्तीची निवड करणे.
४. संपादित केलेली विधाने १ ते ७ बिंदूश्रेणीमध्ये वर्गीकृत करण्याकरता तज्ज्ञाकडे पाठवून दिले. जर एखाद्या विधानाबद्दल तज्ज्ञ व्यक्ती असहमत असेल तर क्रमांक १ ला ✓ अशी खूण करावयाची, जर सहमत असेल तर क्रमांक ७ ला ✓ अशी खूण करावयाची अशा रितीने १ ते ७ बिंदू श्रेणी ही प्रतिकूल ते अनुकूल पातळीनुसार असतात, मध्या बिंदू क्रमांक ४ हा उदासीन असतो.
५. प्रत्येक विधानाचे श्रेणीमूल्य ठरविणे आणि विधानांची संदिग्धता ठरविणे.
६. संदिग्धता असलेली विधाने अभिवृत्ती मापन कसोटीतून वगळणे.

अशा रितीने मूल्यशिक्षणातील तज्ञ व्यक्तींच्या साहयाने संशोधिकेने मूल्यशिक्षणासंबंधीची अभिवृत्ती मापन कसोटी प्रतिसादकांना देण्याकरता तयार केली.

संशोधनाचा हेतू हा मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास करावयाचा असल्यामुळे संशोधिकेने तयार केलेली अभिवृत्ती मापन कसोटी ही तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांना दिली आणि त्यांच्याकडून ती अभिवृत्ती मापन कसोटी भरून घेतली. संशोधिकेने हे काम डिसेंबर ९८ ते जानेवारी ९९ या कालावधीत पूर्ण केले. अभिवृत्ती मापन कसोटी सोबतच संशोधिकेने संशोधनाच्या उद्दिष्टानुसार शिक्षकांची वैयक्तिक माहितीदेखिल भरून घेतली.

३] नमुना

तुळजापूर तालुक्यात एकूण १०६ छोट्या गावांचा समावेश असून पाचवी ते दहावी पर्यन्तचे वर्ग असणा-या एकूण १५८ शाळा आहेत. या शाळांमध्ये पाचवी ते दहावीपर्यन्तच्या वर्गांना शिकविणारे एकूण ७८० शिक्षक कार्यरत आहेत. अशि संशोधिकेने या सर्व शिक्षकांची नमुन्यात निवड केली आहे. या शिक्षकांमध्ये सर्व विषय शिकविणारे शिक्षक असून, संगीत शिक्षक, कला शिक्षक, क्रिडा शिक्षक इत्यादींचा देखिल समावेश आहे. संशोधिकेने इयत्ता पाचवी ते दहावीपर्यन्तचे वर्ग असणा-या फक्त मराठी माध्यमांच्या शाळांतील शिक्षकांची निवड केली असून यामध्ये अनुदानित शाळा, विनाअनुदानित शाळा, जिल्हा परिषद शाळा, खाजगी शाळा, नगरपरिषद शाळा, सैनिक शाळा आणि नवोदय शाळांचा देखिल समावेश केला आहे.

६.४ संकलित माहितीचे पृथक्करण आणि अर्थनिर्वचन

शिक्षकांकडून अभिवृत्ती मापिका कसोटी भरून आल्यानंतर संशोधिकेने संशोधनाच्या उद्दिष्टानुसार मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास करण्याकरता शिक्षकांचे विविध गट पुढीलप्रमाणे तयार केले. १] स्त्री शिक्षिकांचा गट, पुरुष शिक्षकांचा गट २] मागासवर्गीय आणि अमागासवर्गीय शिक्षकांचा गट ३] हिंदूधर्मीय शिक्षक आणि इतर धर्मीय शिक्षक ४] जास्त अध्यापन अनुभव असणारे शिक्षक आणि कमी अध्यापन असणारे शिक्षक.

अशा प्रकारे विविध गट तयार करून त्यांच्या प्राप्तांकाची वारंवारिता सारणी तयार केली. वारंवारिता सारणी तयार केल्यानंतर संख्याशास्त्रीय परिमाणाचा उदाहरणार्थ मध्यमान, प्रमाण विचलन, प्रमाण विचलनाची त्रुटी आणि मूल्य यांचा वापर करून विविध गटांचा मूल्यशिक्षणाकडे पहाण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येतो का ? याचा अभ्यास केला आणि त्यावरून अनुमान, निष्कर्ष मांडले.

संकलित केलेली माहिती योग्य रितीने समजण्याकरता ती वारंवारिता सारणीच्या स्वरूपात लिहली आणि आवश्यक तेथे आलेखाचा वापर केला त्यामुळे संकलित माहिती व्यवस्थितरित्या समजते आणि समजण्यास सोपे जाते.

६.५ निष्कर्ष

तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करण्याकरता संशोधिकेने खालील विविध गट तयार करून त्यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१] स्त्री शिक्षिका आणि पुरूष शिक्षक यांचा गट.

२] मागासवर्गीय आणि अमागासवर्गीय शिक्षकांचा गट

३] हिंदू धर्मीय आणि बिगर हिंदू धर्मीय शिक्षकांचा गट

४] कमी अध्यापन अनुभव असणा-या आणि जास्त अध्यापन अनुभव असणा-या शिक्षकांचा गट

वरील प्रकारे गट तयार करून संशोधिकेने त्यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे आणि जे निष्कर्ष आले आहेत ते पुढे दिलेले आहेत.

संख्याशास्त्रीय अनुमान

१] स्त्री शिक्षिका आणि पुरूष शिक्षक यांच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास.

अनुमान : गणन केलेले t मूल्य 1.619 हे 0.05 सार्थकता स्तरावर 1.96 पेक्षा कमी आहे ($1.619 < 1.96$) म्हणजेच गणन केलेले t चे मूल्य 0.05 स्तरावरील t मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून 0.05 सार्थकता स्तरावर मिळालेले t चे मूल्य सार्थक नाही. यावरून असे म्हणता येईल की स्त्री शिक्षिका आणि पुरूष शिक्षक यांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येत नाही.

२] हिंदू धर्मीय आणि बिगर हिंदू धर्मीय शिक्षक यांच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास.

अनुमान : गणन केलेले t मूल्य 4.48 हे 0.05 सार्थकता स्तरावर 1.96 जास्त आहे. ($4.48 > 1.96$) म्हणजेच गणन केलेले t चे मूल्य 0.05 सार्थकता स्थरावरील t मूल्यापेक्षा (1.96) जास्त आहे. म्हणून 0.05 सार्थकता स्तरावर मिळालेले t चे मूल्य सार्थक आहे. यावरून असे म्हणता येईल की, हिंदू धर्मीय शिक्षक आणि बिगर हिंदू धर्मिय शिक्षक यांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनामध्ये फरक दिसून येतो.

३] मागासवर्गीय आणि अमागासवर्गीय शिक्षकांच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास.

अनुमान : गणन केलेले t चे मुल्य 0.438 हे 0.05 सार्थकता स्तरावर 1.96 पेक्षा कमी आहे. (0.438 < 1.96) म्हणजेच गणन केलेले t मुल्य 0.438 हे 0.05 सार्थकता स्तरावरील t मुल्य (1.96) पेक्षा कमी आहे म्हणून 0.05 सार्थकता स्तरावर मिळालेले t मुल्य सार्थक नाही. यावरुन असे म्हणता येईल की अमागासवर्गीय आणि मागासवर्गीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनामध्ये फरक दिसून येत नाही.

४] कमी अध्यापन अनुभव असणाऱ्या आणि जास्त अध्यापन अनुभव असणाऱ्या शिक्षकांच्या दृष्टीकोनाचा तुलनात्मक अभ्यास.

अनुमान : गणन केलेले t मुल्य 2.69 हे 0.05 सार्थकता स्तरावर 1.96 पेक्षा जास्त आहे. (2.96 > 1.96) म्हणजेच गणन केलेले t चे मुल्य 2.69 हे 0.05 सार्थकता स्तरावरील t मुल्यापेक्षा (1.96) पेक्षा जास्त आहे. म्हणून 0.05 सार्थकता स्तरावर मिळालेले t चे मुल्य सार्थक आहे. यावरुन असे म्हणता येईल की कमी अध्यापन अनुभव असणाऱ्या आणि जास्त अध्यापन अनुभव असणाऱ्या शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येतो.

निष्कर्ष

१] स्त्री शिक्षिका आणि पुरुष शिक्षक यांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्य शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येत नाही.

२] अमागासवर्गीय आणि मागासवर्गीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येत नाही.

३] हिंदू धर्मीय आणि बिगर हिंदू धर्मीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येतो.

४] जास्त अध्यापन अनुभव असणा–या आणि कमी अध्यापन अनुभव असणा–या शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्य शिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येतो.

५] तुळजापुर तालुक्यातील सर्व माध्यमिक शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील व मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अनुकूल दिसून येतो.

६] हिंदू धर्मीय शिक्षकांचा मुल्यशिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अनुकूल दिसून येतो तर बिगर हिंदू धर्मीय शिक्षकांचा मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन प्रतिकूल दिसून येतो.

७] जास्त अध्यापन अनुभव असणा–या शिक्षकांचा मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अनुकूल दिसून येतो तर कमी अध्यापन अनुभव असणा–या शिक्षकांचा मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन प्रतिकूल दिसून येतो.

## ६.६ परिकल्पनांची तपासणी

एकेक परिकल्पना घेऊन तिच्याशी संबंधित सर्व अर्थनिर्वचन, सर्व विशदीकरण एकत्रित करावे व परिकल्पनेची सत्यता, सार्थकता, समर्थनीयता पडताळून पहावी. परिकल्पना ही मान्य किंवा त्याज्य ठरते.

संशोधिकेने सदर संशोधनात शून्य परिकल्पना मांडल्या आहेत. शून्य परिकल्पना परिशुध्द असल्याने तिचे परिक्षण करता येते. शून्य परिकल्पनेचे परिक्षण करुन तिच्या सत्यतेची, संभाव्यता ठरविता येते. सत्यतेच्या किती संभाव्यता मागेपर्यंत ती स्वीकारावी याचे धोरण संशोधकास आधीच निश्चित करावेळे लागते व त्यानुसार त्या परिकल्पनेचा स्वीकार किंवा त्याग करावा लागतो. शून्य परिकल्पनेच्या आधारे संशोधक अभ्यासातील मुख्य परिकल्पनांचा स्वीकार किंवा त्याग करीत असल्यामुळे ती महत्त्वाचीच ठरते. [१]

शून्य परिकल्पनेचा त्याग करण्याकरता ठरविलेल्या सार्थकता स्तरानुसार निवडलेल्या बिंदूला क्रांतिक बिंदू म्हणतात व त्या बिंदूजवळील z गुणाला क्रांतिक अंक किंवा 't Value' म्हणजेच t मुल्य म्हणतात. t मुल्य काढण्याकरता खालील सूत्राचा वापर करतात.

$$t \text{ मुल्य} = \frac{M_1 - M_2}{SE_D}$$

या सूत्रात $M_1$ $M_2$ ही दोन न्यादर्श माध्ये असून $SE_D$ ही दोन माध्यातील फरकाची प्रमाण त्रुटी आहे. t चे मुल्य 1.96 किंवा 1.96 पेक्षा अधिक मिळाल्यास शून्य परिकल्पनेचा 0.05 या सार्थकता स्तरावर त्याग केला जातो आणि दुसरी परिकल्पना स्वीकारली जाते. जर t चे मुल्य 1.96पेक्षा कमी असेल तर शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला जातो.

संशोधिकेने सदर संशोधनात शून्य परिकल्पना मांडल्या आहेत. मिळालेल्या निष्कर्षानुसार या शून्य परिकल्पना स्वीकारल्या का त्याज्य केल्या ते पुढीलप्रमाणे.

---

१. चि. रा. भिंताडे. "शैक्षणिक संशोधन पध्दती" नूतन प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक १३८.

परिकल्पना क्रमांक १] : तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिका आणि पुरुष शिक्षक यांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक असत नाही.

संशोधनातुन प्राप्त झालेले निष्कर्ष – तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिका आणि पुरुष शिक्षक यांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसुन येत नाही.

वरील परिकल्पना १ ही स्वीकारलेली आहे.

परिकल्पना क्रमांक २. : तुळजापूर तालुक्यातील अमागासवर्गीय आणि मागासवर्गीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसुन येत नाही.

संशोधनातुन प्राप्त झालेले निष्कर्ष – तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील अमागासवर्गीय आणि मागासवर्गीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक असत नाही.

वरील परिकल्पना २ ही स्वीकारलेली आहे.

परिकल्पना क्रमांक ३. : तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील हिंदु धर्मीय आणि बिगर हिंदु धर्मीय शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक असत नाही.

संशोधनातुन प्राप्त झालेले निष्कर्ष – तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील हिंदु शिक्षक आणि बिगर हिंदु शिक्षक यांचा नवीन अभ्यासक्रमातील मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसुन येतो. परिकल्पना क्रमांक ३. ही संशोधनात सिध्द झालेले नसल्यामुळे ती त्याज्य केले आहे.

परिकल्पना क्रमांक ४. : तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील कमी अध्यापन अनुभव असणा-या आणि जास्त अध्यापन अनुभव असणा-या शिक्षकाचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक असत नाही.

संशोधनातून प्राप्त झालेले निष्कर्ष : तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील कमी अध्यापन अनुभव असणा-या आणि जास्त अध्यापन अनुभव असणा-या शिक्षकांचा नवीन अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून येतो.

परिकल्पना क्रमांक ४ ही संशोधनात सिद्द झाली नसल्यामुळे ती त्याज्य केली आहे.

## ६.७ सूचना आणि शिफारशी

सदर संशोधन कार्य करीत असताना संशोधिकेला मूल्यशिक्षणासंबंधी कांहि सूचना आणि शिफारशी करणे महत्त्वाचे वाटले असल्यामुळे त्या सूचना आणि शिफारशी संशोधिकेने सुचविल्या आहेत.

१] संशोधिकेला सदर संशोधन कार्यात हिंदू धर्मीय आणि बिगर हिंदू धर्मीय शिक्षकांचा मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फरक दिसून आलेला आहे. तरी शिक्षण अधिकारी, संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी याची नोंद घेऊन हा फरक येण्यामागे काय कारणे आहेत याचा शोध घ्यावा. बिगर हिंदू शिक्षकांचा मूल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन प्रतिकूल दिसून येतो तेव्हा मुख्याध्यापक, शिक्षण अधिकारी, यांनी त्याचा दृष्टीकोन अनुकूल होण्याकरता त्यांना मूल्यशिक्षणाचे महत्त्व पटवून द्यावेत, त्यांना मूल्यशिक्षणासंबंधी योग्य प्रशिक्षण द्यावेत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२] सदर संशोधनात कमी अध्यापन अनुभव असणा-या शिक्षकांचा मूल्यशिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अनुकूल दिसून येत नाही तरी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी इतर सहकारी शिक्षकांनी कमी अध्यापन अनुभव असणा-या शिक्षकांचा मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात अनुकूल बदल होण्याकरता मूल्यशिक्षणाचे महत्व पटवून द्यावे. मूल्यशिक्षणासंबंधी त्यांच्या मनात काही प्रश्न असतील, समस्या असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा.

३] मूल्यशिक्षण हा विषय नवीन असल्यामुळे त्याच्याबद्दल अनेक शिक्षकांच्या मनात विविध प्रश्न उद्भवले आहेत तरी शासनाने, तज्ञ व्यक्तिने वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांच्या समस्या दूर कराव्यात.

४] शासनाने मूल्यशिक्षणाच्या तज्ज्ञ व्यक्तीकडून मूल्यशिक्षण नियोजन तक्ता तयार करून घेऊन त्या शाळेंना पुरवाव्यात म्हणजे शिक्षकांना, मुख्याध्यापकांना योग्य प्रकारे मूल्यशिक्षणाचे नियोजन करता येईल.

५] मूल्यशिक्षण हा विषय सक्तीचा केल्यामुळे प्रत्येक शाळेत आज मूल्यशिक्षणाची कार्यवाही होताना दिसत आहे. परंतु मूल्यशिक्षणाच्या या तासिकेचे व्यवस्थित नियोजन केले जात आहे का, कार्यक्रमात विविधता आहे का ? कार्यवाही योग्य रितीने होत आहे का ? याची तपासणी शिक्षण अधिकारी, मुख्याध्यापक आणि तज्ञ यांनी वेळोवेळी केली पाहिजे.

६.८ <u>पुढील संशोधनार्थ विषय</u>

१] सदर संशोधनात संशोधिकेने फक्त तुळजापूर तालुक्याचाच विचार केलेला आहे तरी यापुढे इतर तालुक्यांचा, शहराचा, जिल्हयातील शिक्षकांचा मूल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करावा.

२] प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा मुल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा चिकित्सक अभ्यास करावा.

३] विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा मुल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे.

४] सदर संशोधनात कमी अध्यापन अनुभव असणाऱ्या शिक्षकांचा मुल्यशिक्षण विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अनुकूल दिसून येत नाही तरी त्याचा तसा दृष्टीकोन होण्यामागे कोणती कारणे आहेत याचा शोध घेणे गरजेचे आहे आणि त्यावर उपाय योजना केल्या पाहिजेत.

५] सदर संशोधनात बिगर हिंदु धर्मीय शिक्षकांचा मुल्यशिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अनुकूल दिसून येत नाही तरी त्याचा तसा दृष्टीकोन होण्यामागे काय कारणे आहेत याचे संशोधन होणे गरजेचे आहे आणि त्यावर योग्य उपाययोजना होणे गरजेचे आहे.

६] सदर संशोधनात संशोधिकेने फक्त थर्स्टनच्या अभिवृत्ती मापन तंत्राचा वापर करुन शिक्षकांचा मुल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास केला आहे. परंतु थर्स्टन तंत्राव्यतिरिक्त लिकर्ट अभिवृत्तीमापन तंत्र, गटमन अभिवृत्ती मापन तंत्र, सामाजिक अंतर मापन श्रेणी इत्यादी तंत्राचा वापर करुन शिक्षकांचा, विद्यार्थ्यांचा मुल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

७] अभिवृत्ती तयार होण्याकरता विविध घटक परिणाम करीत असतात उदाहरणार्थ लिंग, वय, सामाजिक स्तर, शैक्षणिक पात्रता, कुटुंब इत्यादी संशोधिकेने फक्त लिंग, धर्म, जाती-जमाती आणि अध्यापन अनुभव या घटकांचाच विचार केला आहे तरी यापुढे इतर घटकांवर उदाहरणार्थ वय, शैक्षणिक पात्रता व्यावसायिक पात्रता, सामाजिक स्तर, कुटुंब इत्यादी घटकांचा समावेश करुन अभिवृत्तीचे मापन करणे गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१] आफळे रा. रा. बापट भा. वे. — "शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान" श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे प्रथम आवृत्ती, १९७३, पृष्ठ संख्या ४१५

२] बिहारी पंडित बन्सी — "भविष्याभ्यास आणि उद्याचे शिक्षण" नूतन प्रकाशन, २१८१ सदाशिव पेठ, पुणे ३०. प्रथम आवृत्ती १९९०, पृष्ठ क्रमांक ६०.

३] डॉ. भिंताडे वि. रा. — "शैक्षणिक संशोधन पद्धती" नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती पृष्ठ संख्या १६८

४] बापट भा. गो. — "शैक्षणिक संशोधन", नूतन प्रकाशन पुणे तृतीय आवृत्ती, १९८८, पृष्ठ क्रमांक २२०

५] डॉ. करंदीकर सुरेश — "मूल्यशिक्षण" फडके प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती १९९७, पृष्ठ संख्या २७१

६] डॉ. करंदीकर सुरेश — "शैक्षणिक मानसशास्त्र", फडके प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती १९९४, पृष्ठ ३५२

७] करकरे शां. ग. — "शैक्षणिक मानसशास्त्र", व्हीनस प्रकाशन शनिवार पेठ, पुणे, तिसरी आवृत्ती १९७२ पृष्ठ संख्या ५५०

८] कुंडले म. बा. — "शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र" महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, श्री विद्या प्रकाशन, पुणे, आठवी आवृत्ती १९९६, एकूण पृष्ठ संख्या ६९४.


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

९] प्रा. डॉ. भोसले कुन्दा — "माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण समस्या" प्रकाशक डॉ. कुन्दा भोसले, नाशिक प्रथम आवृत्ती १९९४, पृष्ठ संख्या १५९

१०] डॉ. देशमुख अ. ल. — "विद्यार्थी विकासाच्या दिशा-भाग १" सुविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९४

११] दांडेकर वा. ना. — "शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र", श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०, चौथी आवृत्ती १९९२, पृष्ठ संख्या ४०९.

१२] डॉ. कक्कड गुरुप्रसाद डॉ. गायकवाड शशी — "शिक्षण व अध्यापक शिक्षण विचार मंथन" नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती १९९५, पृष्ठ संख्या ३४२.

१३] काळे प्रेमला — "बाल मानसशास्त्र" महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, श्री विद्या प्रकाशन, सदाशिव शनिवार पेठ, पुणे, व्दितीय आवृत्ती १९८६, पृष्ठ संख्या ४९९.

१४] कुलकर्णी के. वि. — "शैक्षणिक मानसशास्त्र", श्री विद्या प्रकाशन शनिवार पेठ, पुणे ३०, प्रथम आवृत्ती, पृष्ठ संख्या ४२४

१५] डॉ. जगताप ह. ना. — "शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र", नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती १९८८, पृष्ठ संख्या ३३६

१६] डॉ. जगताप ह. ना. [सं.] — "शैक्षणिक मानसशास्त्र", अनमोल प्रकाशन, पुणे २, प्रथम आवृत्ती १९९५, पृष्ठ संख्या ४७८

१७] डॉ. पारसनीस न. र. — "प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र", नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, प्रथमआवृत्ती १९९० एकूण पृष्ठ संख्या ४३०

१८] डॉ. पारसनीस न. र. "स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण" नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती १९९४, पृष्ठ संख्या २९२

१९] पवार ना. ग. "भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह" नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती १९९१, पृष्ठ संख्या १७२.

२०] डॉ. पाण्डेय रामशकल, डॉ. मिश्रा कल्याणशंकर "मूल्यशिक्षण", विनोद पुस्तक मंदिर, आग्रा २, पृष्ठ संख्या १५२

२१] डॉ. ठोंबरे विद्या "नितीमुल्ये व शिक्षण", नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती १९९६ पृष्ठ संख्या

२२] उपासनी ना. के. कुलकर्णी के. वि. "नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र" श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे प्रथम आवृत्ती १९८७, पृष्ठ संख्या २२३

२३] मुळे रा. श. उमाटे वि. तु. "शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे", साहित्य प्रसार केंद्र, नागपूर १२, प्रथम आवृत्ती १९७७, पृष्ठ संख्या

२४] देऊस्कर विजय [सं.] "रुप सप्तरंगी प्रेरणा" महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. प्रथम आवृत्ती, १९९७.

२५] पाटील वसंत [सं.] "जीवन शिक्षण" महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.

२६] पेठे मधुकर [संपादक] "भारतीय शिक्षण", भारतीय शिक्षण मंडळ, मुंबई.

२७] पाटील विजय [संपादक] "शिक्षण संक्रमण", महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

28) Best J.W. "RESEARCH IN EDUCATION", Fourth Edition New Delhi, Prentice Hall of India Pvt. Ltd. 1982.

29) Buch M.B.(Ed.) "EDUCATIONAL INVESTIGATION IN INDIAN UNIVERSITIES" (1939-1961), New Delhi, N.C.E.R.T., 1969.

30) Buch M.B.(Ed.) "SECOND SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" (1972-78), Baroda, Society for educational research and development.1979.

31) Buch M.B.(Ed.) "THIRD SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" (1979-83), New Delhi, N.C.E.R.T.,1985.

32) Buch M.B. (Ed.) "FOURTH SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" (1983-88), Vol.II, New Delhi N.C.E.R.T.1991.

33) Buch M.B.(Ed.) "FIFTH SURVEY OF EDUCATIONAL RESEARCH" 1988-92, Vol.I, New Delhi, N.C.E.R.T.,1997.

34) Mohsin S.M. "ATTITUDE, CONCEPT, FORMATION AND CHANGE" Wiley Eastern Limited, Darya Ganj, New Delhi 2, Pages 163.

35) Buch M.B. (Ed.) "A SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" Centre of Advanced Study in Education, Baroda, 1974.

36) Sidhu Kulbir Singh "METHODOLOGY OF RESEARCH EDUCATION" Sterling Publishers Pvt.Ltd.,New Delhi, Second Edition, 1987.

परिशिष्ट "अ"

तज्ज्ञांना वर्गीकृत करण्याकरता पाठविलेल्या विधानांची
यादी आणि सोबत त्यांना पाठविलेले विनंतीपूर्वक पत्र

विनंती पत्र

श्रीमती औनामे अे. व्हि.
तुळजापूर, जि. उस्मानाबाद

प्रति,

माननीय महोदय,

स. न. वि. वि.

महोदय,

मी कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर येथून डॉ. जगताप ह. ना. यांच्या मार्गदर्शनाखाली एम्. फिल करीत आहे. माझ्या संशोधनाचा हेतु हा "तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांच्या मुल्यशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोन" असा आहे. या करता मला अभिवृत्ती मापिका कसोटी तयार करावयाची आहे. आपण मुल्यशिक्षण विषयातील तज्ज्ञ आहात म्हणुन आपण मला माझ्या संशोधनाच्या विषयानुसार अभिवृत्तीमापिका कसोटी तयार करण्यास मार्गदर्शन करावे ही विनंती.

मुल्यशिक्षणाच्या संदर्भात अभिवृत्तीमापिकेसाठी तयार केलेली विधाने दिलेली आहेत. तरी आपण या विधानासंबंधिची मते खालील सूची प्रमाणे द्यावीत ही विनंती.

पुढे दिलेल्या विधानाची यादी ही मुल्यशिक्षणासंबंधी आहे. आपण त्या दिलेल्या विधानाशी सहमत वा असहमत आहात आणि किती प्रमाणात हे आपणास सुचित करावयाचे आहे.

जर आपण एखादया विधानाशी पूर्णपणे असहमत असाल तर क्रमांक १ ला ✓ अशी खुण करा, जर आपण दिलेल्या विधानाशी पूर्णपणे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सहमत असाल तर क्रमांक ७ ला ✓ अशी खूण करा. अशा प्रकारे एकुण ७ श्रेणी दिलेल्या असून आपण आपले मत व्यक्त करण्यापूर्वी खालील सूचीचा वापर करावा.

* पूर्णपणे असहमत असाल तर क्रमांक १ ला ✓ अशी खूण करा.
* पूर्णपणे असहमत नाही पण जास्त प्रमाणात असहमत असल्यास क्रमांक २ ला ✓ अशी खूण करा.
* थोड्या प्रमाणात असहमत असल्यास क्रमांक ३ ला ✓ अशी खूण करा.
* असहमत वा सहमत हे व्यक्त करता येत नसेल तर क्रमांक ४ ला ✓ अशी खूण करा.
* थोड्या / अल्प प्रमाणात असहमत असल्यास क्रमांक ५ ला ✓ अशी खूण करा.
* पूर्णपणे सहमत नाही पण जास्त प्रमाणात सहमत असल्यास क्रमांक ६ ला ✓ अशी खूण करा.
* पूर्णपणे सहमत असल्यास क्रमांक ७ ला ✓ अशी खूण करा.

सदरची माहिती फक्त संशोधनाकरिताच वापरली जाईल व ती पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल. संशोधनाचे निष्कर्ष मिळविण्यासाठी आपल्या सहकार्याची व मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, आपण ती द्याल अशी खात्री आहे. तरी मी पुन्हा एकदा ~~अत्र~~ आपणास विनंती करते की आपण दिलेल्या विधानासंबंधीची अचूक मते कळवून लवकरात लवकर अभिवृत्ती मापिका कसोटी भरून द्याल अशी अपेक्षा आहे.

सोबत संशोधिकेने स्वतःचे नाव आणि पत्ता असलेला लिफाफा जोडलेला आहे तरी आपण अभिवृत्ती मापिका कसोटी वर्गीकृत करून त्या लिफाफ्यात घालून संशोधिकेस पाठवावी, ही विनंती.

कळावे,

आपली,

[श्रीमती ओनामे ॲ. व्हि. ]

सूची

०१ जर आपण दिलेल्या विधानाशी पूर्णपणे असहमत असाल तर क्रमांक १ ला ✓ अशी खूण करा.

०२ जर आपण दिलेल्या विधानाशी पूर्णपणे असहमत नाही पण जास्त प्रमाणात असहमत असल्यास क्रमांक २ ला ✓ अशी खूण करा.

०३ जर आपण दिलेल्या विधानाशी थोड्या प्रमाणात असहमत असल्यास क्रमांक ३ ला ✓ अशी खूण करा.

०४ जर आपणास दिलेल्या विधानाशी सहमत आहे वा नाही हे व्यक्त करता येत नसेल तर क्रमांक ४ ला ✓ अशी खूण करा.

०५ जर आपण दिलेल्या विधानाशी थोड्या / अल्प प्रमाणात सहमत असल्यास क्रमांक ५ ला ✓ अशी खूण करा.

०६ जर आपण दिलेल्या विधानाशी पूर्णपणे सहमत नाही पण जास्त प्रमाणात सहमत असल्यास क्रमांक ६ ला ✓ अशी खूण करा.

०७ जर आपण दिलेल्या विधानाशी पूर्णपणे सहमत असल्यास क्रमांक ७ ला ✓ अशी खूण करा.

शासनाने मूल्यशिक्षणात पुढील दहा मूल्यांचा समावेश प्रामुख्याने केलेला आहे.

१] राष्ट्रभक्ती २] सर्वधर्मसहिष्णुता ३] राष्ट्रीय एकात्मता
४] स्त्री-पुरुष समानता ५] श्रमनिष्ठा ६] वैज्ञानिक दृष्टीकोन
७] सौजन्यशीलता ८] संवेदनशीलता ९] वक्तशीरपणा
१०] नीटनेटकेपणा

विधाने

०१ मूल्य शिक्षण हा अध्यापनाचा स्वतंत्र विषय होऊच शकत नाही.

१ २ ३ ४ ५ ६ ७

०२ पाठ्यपुस्तकात ते ते मूल्य जेथे जेथे येईल तेथे तेथे त्याचा पाठपुरावा करावयास हवा.

१ २ ३ ४ ५ ६ ७

०३ विविध विषयात प्रसंगात ते ते मूल्य जेथे जेथे येईल तेथे तेथे त्याचा पाठ्यपुरावा करावयास हवा.

१ २ ३ ४ ५ ६ ७

०४ अभ्यासानुवर्ती कार्यक्रमात ते ते मूल्य जेथे जेथे येईल तेथे तेथे त्याचा पाठ्यपुरावा करावयास हवा.

१ २ ३ ४ ५ ६ ७

०५ दैनंदिन अध्यापनात विविध विषय, शिकविताना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रकट होणाऱ्या मूल्यांची, संस्कारांची शिक्षकाने सूक्ष्मपणे नोंद घेणे आवश्यक आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

०६ मूल्यशिक्षणाला स्वतंत्रपणे तासिकांची जरुरी नाही, वेळापत्रकाची आवश्यकता नाही आणि परिक्षेची तर गरज नाहीच.

१ २ ३ ४ ५ ६ ७

०७ शिक्षणाच्या माध्यमातून मानवाचा खरा विकास व्हावयाचा असेल तर शाश्वत व चिरंतन मूल्यांचा त्याला वेध घ्यावा लागेल.

१ २ ३ ४ ५ ६ ७

०८ मूल्यांची केवळ तात्त्विक चर्चा करण्यापेक्षा मूल्यांच्या क्रियात्मकतेवर भर असला पाहिजे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

०९ स्वत्व, अस्मिता यांची जागृती करणे व त्यातून आत्मविकास साधणे हे मूल्य शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१० समाजाचे अधःपतन होत आहे ते थांबविण्यासाठी मूल्यशिक्षणाची नितांत गरज आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

११ मानवाची वैज्ञानिक प्रगती कितीही प्रचंड प्रमाणात होत असली तर त्यांच्या शांत व निरामय जीवनासाठी मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१२ शाळा हे एक असे केंद्र आहे की जेथे विद्यार्थ्यांवर जाणीवपूर्वक संस्कार करता येतात त्या संस्कारासाठी योग्य ते वातावरण निर्माण करता येते.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१३ बालवयात विद्यार्थ्यांच्या मनावर शिक्षकांच्या विचारांचा तसेच वर्तनाचा जबरदस्त पगडा असतो हे ध्यानात घेऊन व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे व आवश्यक त्या मूल्यांचा संस्कार करता येतो.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१४ स्वतंत्र तासिकेत परिपाठाच्या माध्यमातून मूल्य संक्रमित होतात.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१५ कथा हा प्रकार विद्यार्थ्यांना भावणारा असल्यामुळे त्यातून चांगली मूल्य, उत्तम संस्कार विद्यार्थ्यांत रुजविता येणे सहज शक्य आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१६ मूल्य म्हणजे जे महत्वाचे आहे, योग्य आहे, श्रेयस आहे ते.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१७ शिक्षणातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व त्यांचे चारित्र्य संवर्धन घडवावयाचे असते, त्यांच्यावर चांगले संस्कार करावयाचे असतात ही संस्कारप्रक्रिया म्हणजेच काही विशिष्ट मूल्ये विद्यार्थ्यांवर बिंबवण्याची प्रक्रिया.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१८ कोणते ज्ञान द्यावयाचे तेच का, तसेच कोणत्या मूल्यांचे संस्कार करावयाचे व त्याच मूल्यांचे का ? हे ही प्रश्न शिक्षणक्षेत्रात उपस्थित होतात व ते महत्त्वाचेच असतात.

१ २ ३ ४ ५ ६ ७

१९ शैक्षणिक दृष्टिने विद्यार्थ्यांच्या संदर्भात विचार करता मूल्यांची अर्थनिश्चिती व व्याप्ती स्पष्ट करण्याची नितांत आवश्यकता आहे.

२० प्रत्येक मूल्याचा संबोध व त्यातून अपेक्षित वर्तनपरिवर्तन यासंबंधी निर्णय घेण्याची तातडीची आवश्यकता आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

२१ मूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर कसे करावेत हा शिक्षकांना पडलेला एक यक्ष प्रश्न आहे. तसेच मूल्यमीमांसेच्या क्षेत्रात उभे टाकलेले एक जबरदस्त आव्हानही आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२२] मुल्ये शिकवून रुजविता येत नाहीत. घरातील वडिलधा-या मंडळींनी समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी आणि शिक्षकांनी आपल्या आचरणात समाजात रुजवावयाला हवीत.

१ २ ३ ४ ५ ६ ७

२३] संस्कार, मूल्यशिक्षण ही काही तीस-पस्तीस मिनिटांच्या कालावधीत होणारी गोष्ट नाही. ती सातत्याने होणारी प्रक्रिया आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

२४] मुल्यशिक्षण हा चर्चेचा नव्हे, तर संस्कृतीचा विषय आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

२५] मुल्यशिक्षण स्वतंत्रपणे देणे व त्यासाठी इतर अभ्यासक्रम कमी करुन वेळ उपलब्ध करुन देणे हे योग्य नव्हे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

२६] योग्य तो अभ्यासक्रम निष्ठेने शिकविला जावा व मुल्यशिक्षण हे अभ्यासक्रमाचा एक भागबनूनच विद्यार्थ्यांकडे जावे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

२७] विद्यार्थ्यात मानवी मुल्यांबद्दल सर्वार्थाने आस्था व जाणीव निर्माण झाली पाहिजे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

२८] मानवी मुल्यांचे संस्कार हे केवळ पाठ्यपुस्तकातुन होणार नाही, तर शिक्षक विद्यार्थी संबंधातुन हे घडणार असतात.

१ २ ३ ४ ५ ६ ७

२९] मुल्यशिक्षण म्हणजे व्यक्तीला माणूस बनविणारे शिक्षण.

१ २ ३ ४ ५ ६ ७

३०] मुल्यशिक्षण इतर विषयांसारखे नुसते शिकवुन चालणार नाही, त्याला आचरणाची जोड द्यावी लागेल.

१ २ ३ ४ ५ ६ ७

३१] महाराष्ट्र शासनाने "मुल्यशिक्षण" हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करुन मूल्यांच्या अभ्यासाचे ओझे कमी करण्याऐवजी ते वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.

१ २ ३ ४ ५ ६ ७

## परिशिष्ट - "ब"

### तज्ज्ञ व्यक्तींची नावे आणि पत्ता

| | | |
|---|---|---|
| १] | श्री डॉ. देवस्थळी आर. बी. | शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| २] | डॉ. सीमा येवले, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | |
| ३] | श्री प्रकाश आंधळे, | शिक्षण विस्तार अधिकारी, तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद |
| ४] | श्रीमती स्वर्णलता भिशीकर | मुख्याध्यापिका, ज्ञानप्रबोधिनी विद्यालय, सोलापूर |
| ५] | श्री आर.एस. नष्टे | मुख्याध्यापक, सिद्धेश्वर हायस्कूल, सोलापूर |
| ६] | श्री राजशेखर कळसे | प्राचार्य, दयानंद शिक्षण महाविद्यालय सोलापूर |
| ७] | श्री डॉ. सुरेश करंदीकर | प्राध्यापक, दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| ८] | श्री सच्चिदानंद मोकाशी | समन्वयक, दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| ९] | श्री डॉ. व्ही.आर. शिंताडे | प्राचार्य, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| १०] | श्री डॉ. एस्.एस्. जगताप | प्राध्यापक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| ११] | श्री डॉ. ए.बी.गायकवाड | प्राध्यापक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| १२] | श्री डॉ. के.एम्. बोंदार्डे | प्राध्यापक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| १३] | श्रीमती डॉ. वसुधा कुलकर्णी | प्राध्यापिका, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| १४] | श्री डॉ. बी.जी. अहिरे | प्राध्यापक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |

| | |
|---|---|
| १५] श्रीमती नसिमा पठाण | प्राध्यापिका, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| १६] श्री टेके ए. जी. | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| १७] डॉ. रामदास बरकले | कॉलेज ऑफ एज्युकेशन, गंगापूर रोड, नाशिक |
| १८] डॉ. श्रीमती सुनंदा एडके | प्राचार्य, आदर्श कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे. |
| १९] सौ. भोरे | मुख्याध्यापिका, सेवासदन हायस्कूल, सोलापूर |
| २०] श्री नागेश जाधव | शिक्षक, सरस्वती विद्यामंदिर, सोलापूर |
| २१] सौ. आशालता जगताप | मुख्याध्यापिका, महानगरपालिका शाळा क्रमांक ६, सोलापूर |
| २२] श्री स्वाती बायस | शिक्षिका, महानगरपालिका शाळा क्रमांक ६, सोलापूर |
| २३] श्री मुंडे | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| २४] श्रीमती भोजे | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| २५] श्री अवधूत म्हमाणे | न्यू इंग्लिश स्कूल, सलगर वस्ती, सोलापूर |
| २६] श्री मधुकर वेदांते | प्राचार्य, कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर, सांगली. |
| २७] डॉ. आनंद वास्कर | प्राचार्य, जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी, जि. कोल्हापूर |
| २८] श्री चंद्रकांत मोरे | प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| २९] श्री वा. ना. उत्पात | मुख्याध्यापक, कवठेकर प्रशाला पंढरपूर, जिल्हा सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| ३०] | प्रा. बोरगे | महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगांव, जि. सोलापूर |
| ३१] | श्रीमती मीना स्हीकर | प्राध्यापक, नेहरु कॉलेज ऑफ कॉमर्स, औरंगाबाद |
| ३२] | श्रीमती मंगला सेंकापे | शिक्षिका, सेंट फ्रान्सिस स्कूल, औरंगाबाद |
| ३३] | डॉ. चित्रा सोहोनी | एस. एन. डी. टी. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एरंडवणा, पुणे |
| ३४] | श्रीमती नाझरे | शिक्षिका, बोल्ली प्रशाला, सोलापूर |
| ३५] | प्रा. पाटील एस. एस. | कुचन ज्युनिअर कॉलेज, सोलापूर |
| ३६] | डॉ. श्रीमती रेखा टोपकर | पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली. |
| ३७] | प्र. द. पुराणिक | आदर्श विद्यामंदिर, पुणे |
| ३८] | श्रीमती डॉ. माकडे | जनता कॉलेज ऑफ एज्युकेशन, चंद्रपूर |
| ३९] | डॉ. हिरा आहेर | नागपूर विद्यापीठ, बॅ. वानखेडे, बी. एड्. कॉलेज, नागपूर |
| ४०] | श्रीमती आरबाळे | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फलटण, जि. सातारा. |
| ४१] | श्रीमती भागे | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फलटण, जि. सातारा |
| ४२] | श्रीमती हदगावकर | शिक्षिका, पंचशील विद्यार्जन हायस्कूल, हदगाव , जि. नांदेड |
| ४३] | श्रीमती काळेकर | प्राध्यापक, पंचशील कनिष्ठ महाविद्यालय हदगांव, जि. नांदेड |
| ४४] | श्री वले | उपमुख्याध्यापक, पंचशील विद्यार्जन हायस्कूल हदगांव, जि. नांदेड |
| ४५] | श्री टिकोरे | मुख्याध्यापक विवेकानंद शिक्षण संस्था, हदगांव |
| ४६] | सौ मीनाताई टेरे | शिक्षिका, सरस्वती विद्या मंदिर, सोलापूर |
| ४७] | सौ. सुवर्णा बाके | प्राध्यापक, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर |
| ४८] | श्री जाधव | केंद्रप्रमुख, तालुका तुळजापूर, जि. उस्मानाबाद |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## परिशिष्ट - "क"

## शिक्षकाकडून अभिवृत्ती मापन कसोटी भरून घेण्यासंदर्भात त्यांना दिलेले विनंतीवजा पत्र

प्रति,
माननीय महोदय,
स. न. वि. वि.

महोदय,

मी कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर येथून डॉ. जगताप ह. ना. यांच्या मार्गदर्शनाखाली एम्. फिल. करीत आहे. माझ्या संशोधनाचा हेतु हा "तुळजापूर तालुक्यातील शिक्षकांच्या मूल्य शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन" असा आहे. या करता मला अभिवृत्ती मापिका कसोटी तयार करावयाची आहे.

मूल्य शिक्षणाच्या संदर्भात अभिवृत्ती मापिकेसाठी तयार केलेली विधाने दिलेली आहेत. तरी आपण या विधानासंबंधीची मते सूचनेप्रमाणे द्यावी ही विनंती.

पुढे दिलेल्या विधानाची यादी ही मूल्यशिक्षणासंबंधी आहे. आपण त्या दिलेल्या विधानाशी सहमत वा असहमत आहात ते सूचित करावयाचे आहे. जर आपण दिलेल्या विधानाशी सहमत असाल तर त्या विधानापुढे दिलेल्या कंसात बरोबर [/] अशी खूण करावी, जर आपण दिलेल्या विधानाशी असहमत असाल तर कोणतीही खूण करू नये.

सदरची माहिती फक्त संशोधनासाठीच वापरली जाईल व ती पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल. संशोधनाचे निष्कर्ष मिळविण्यासाठी आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे व आपण ती द्याल अशी खात्री आहे तरी मी पुन्हा एकदा आपणास विनंती करते की, आपण दिलेल्या विधानासंबंधिची अचूक मते कळवून लवकरात लवकर अभिवृत्ती मापिका कसोटी भरून द्याल अशी अपेक्षा आहे.

कळावे.

आपली विश्वासू

[ ओनामे अे. व्हि. ]

## परिशिष्ट - "ड"

### शिक्षकांकडून भरून घ्यावयाच्या वैयक्तिक माहितीचे परिपत्रक आणि अभिवृत्ती मापन कसोटी.

---

अ] अभिवृत्ती चाचणी देणाऱ्या शिक्षकांची वैयक्तिक माहिती

१] संपूर्ण नांव श्री/श्रीमती -

२] लिंग स्त्री / पुरुष

३] शाळेचा पत्ता

४] धर्म

५] पुढीलपैकी कोणत्या जमातीमध्ये मोडता. योग्य पर्यायावर ✓ अशी खूण करा.

मागासवर्गीय / अमागासवर्गीय

६] अध्यापनाचा एकुण कालावधी.
[ किती वर्षापासून अध्यापन करित आहात ? ]

७] कोणत्या इयत्तांना अध्यापन करता.

८] अध्यापनाचे विषय -

ब] अभिवृत्ती मापन कसोटी

सूचना : खाली काही विधाने दिली आहेत. ज्या विधानांशी तुम्ही सहमत आहात त्याच विधानापुढील कंसात बरोबर ✓ अशी खूण करा. ज्या विधानाशी तुम्ही सहमत नाही त्यापुढे कांहीही करु नये.

१] मूल्यशिक्षण हा अध्यापनाचा स्वतंत्र विषय होऊच शकत नाही. [ ]

२] पाठ्यपुस्तकात ते ते मूल्य जेथे जेथे येईल तेथे तेथे त्याचा पाठ्यपुरावा करावयास हवा. [ ]

३] विविध विषयात प्रसंगात ते ते मूल्य जेथे जेथे येईल तेथे तेथे त्याचा पाठ्यपुरावा करावयास हवा. [ ]

४] अभ्यासानुवर्ती कार्यक्रमात ते ते मूल्य जेथे जेथे येईल तेथे तेथे त्याचा पाठपुरावा करावयास हवा. [ ]

५] दैनंदिन अध्यापनात विविध विषय शिकविताना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रकट होणाऱ्या मूल्यांची, संस्कारांची शिक्षकाने सूक्ष्मपणे नोंद घेतली पाहिजे. [ ]

६] मूल्यशिक्षणाला स्वतंत्र तासिकांची जरुरी नाही, वेळापत्रकाची आवश्यकता नाही आणि परिक्षेची तर गरज नाहीच. [ ]

७] शिक्षणाच्या माध्यमातून मानवाचा खरा विकास व्हावयाचा असेल तर शाश्वत व चिरंतन मूल्यांचा त्याला शोध घ्यावा लागेल. [ ]

८] मूल्यांची केवळ तात्त्विक चर्चा करण्यापेक्षा मूल्यांच्या क्रियात्मकतेवर भर असला पाहिजे. [ ]

९] स्वत्व, अस्मिता यांची जागृती करणे व त्यातून आत्मविकास साधणे हे मूल्य शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. [ ]

१०] समाजाचे अध:पतन होत आहे ते थांबविण्यासाठी मूल्यशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. [ ]

११] मानवाची वैज्ञानिक प्रगती कितीही प्रचंड प्रमाणात होत असली तरी त्याच्या शांत व निरामय जीवनासाठी मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे. [ ]

१२] शाळा हे एक असे केंद्र आहे की जेथे विद्यार्थ्यांवर जाणिवपूर्वक संस्कार करता येतात त्या संस्कारासाठी योग्य ते वातावरण निर्माण करता येते. [ ]

१३] बालवयात विद्यार्थ्यांच्या मनावर शिक्षकांच्या विचारांचा तसेच वर्तनाचा जबरदस्त पगडा असतो हे ध्यानात घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे व आवश्यक त्या मूल्यांचे संस्कार करता येते. [ ]

१४] स्वतंत्र तासिकेत परिपाठाच्या माध्यमातून मूल्य संक्रमित होतात. [ ]

१५] कथा हा प्रकार विद्यार्थ्यांना भावणारा असल्यामुळे त्यातून चांगली मूल्ये, उत्तम संस्कार विद्यार्थ्यांत रुजविता येणे सहज शक्य आहे. [ ]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१६] मूल्य म्हणजे जे महत्वाचे आहे, योग्य आहे, श्रेयस आहे ते. [ ]

१७] शिक्षणातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व त्याचे चारित्र्य संवर्धन घडवावयाचे असते, त्यांच्यावर चांगले संस्कार करावयाचे असतात. ही संस्कारप्रक्रिया म्हणजेच काही विशिष्ट मूल्ये विद्यार्थ्यांवर बिंबविण्याची प्रक्रिया. [ ]

१८] कोणते ज्ञान द्यावयाचे व तेच का, तसेच कोणत्या मूल्यांचे संस्कार करावयाचे व त्याच मूल्यांचे का ? हे ही प्रश्न शिक्षण क्षेत्रात उपस्थित होतात व ते महत्त्वाचेच असतात. [ ]

१९] शैक्षणिक दृष्टिने विद्यार्थ्यांच्या संदर्भात विचार करता मूल्यांची अर्थनिश्चिती व व्याप्ती स्पष्ट करण्याची नितांत आवश्यकता आहे. [ ]

२०] प्रत्येक मूल्यांचा संबोध व त्यातून अपेक्षित वर्तनपरिवर्तन यासंबंधी निर्णय घेण्याची तातडीची आवश्यकता आहे. [ ]

२१] मूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर कसे करावेत हा शिक्षकांना पडलेला एक यक्ष प्रश्न आहे. तसेच मूल्यशिक्षणाच्या क्षेत्रात उभे टाकलेले एक जबरदस्त आव्हानही आहे. [ ]

२२] मूल्ये शिकवून रूजविता येत नाहीत, घरातील वडिलधाऱ्या मंडळींनी समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी आणि शिक्षकांनी आपल्या आचरणाने समाजात रूजवावयाला हवीत. [ ]

२३] संस्कार, मूल्यशिक्षण ही काही तीस-पस्तीस मिनिटांच्या कालावधीत होणारी गोष्ट नाही. ती सातत्याने होणारी प्रक्रिया आहे. [ ]

२४] मूल्यशिक्षण हा चर्चेचा नव्हे, तर संस्कृतीचा विषय आहे. [ ]

२५] मूल्यशिक्षण स्वतंत्रपणे देणे व त्यासाठी इतर अभ्यासक्रम कमी करून वेळ उपलब्ध करून देणे हे योग्य नव्हे. [ ]

२६] योग्य तो अभ्यासक्रम निष्ठेने शिकविला जावा व मूल्यशिक्षण हे अभ्यासक्रमाचा एक भाग बनूनच विद्यार्थ्यांकडे जावे. [ ]

२७] विद्यार्थ्यात मानवी मूल्यांबद्दल सर्वार्थाने आस्था व जाणिव निर्माण झाली पाहिजे. [ ]

२८] मानवी मूल्यांचे संस्कार हे केवळ पाठ्यपुस्तकातून होणार नाही, तर शिक्षक विद्यार्थी संबंधातून ते घडणार आहे. [ ]

२९] मूल्यशिक्षण म्हणजे व्यक्तीला माणूस बनविणारे शिक्षण. [ ]

३०] मूल्यशिक्षण इतर विषयांसारखे नुसते शिकवून चालणार नाही, त्याला आचरणाची जोड द्यावी लागेल. [ ]

## परिशिष्ट - "इ"

तुळजापूर तालुक्यातील गावांची नावे, शाळा आणि ~~xxxx~~ शिक्षकांची संख्या.

| गावाचे नांव | शाळेचे नांव | शिक्षक संख्या |
|---|---|---|
| १] तुळजापूर | जिल्हा परिषद प्रशाला | १६ |
| | जिल्हापरिषद कन्या प्रशाला | २२ |
| | महर्षी वि. रा. शिंदे हायस्कूल | २९ |
| | कुलस्वामिनी विद्यालय | १३ |
| | म. फुले रात्रशाळा | ०४ |
| | जिजामाता कन्या प्रशाला | १० |
| | तुळजाभवानी सैनिक शाळा | ०४ |
| | तुळजाभवानी विद्यामंदिर | ०६ |
| | रामवरदायिनी विद्यामंदिर | ०६ |
| | शांतीसागर प्राथमिक विद्यामंदिर | ०५ |
| | लिटल फ्लावर मराठी माध्यम शाळा | ०४ |
| | नगरपरिषद शाळा क्रमांक १ | ०४ |
| | नगरपरिषद शाळा क्रमांक २ | ०४ |
| | हंगरगेकर माध्यमिक शाळा | ०४ |
| | नवोदय विद्यालय | १३ |
| २] माळुंब्रा | जिल्हा परिषद प्रशाला | १२ |
| ३] काटी | जिल्हा परिषद प्रशाला | १३ |
| | केंद्र प्राथमिक शाळा | ०५ |
| | येडेश्वरी कन्या विद्यालय | ०५ |
| | केंद्र प्राथमिक कन्या विद्यालय | ०६ |
| ४] सावरगाव | जिल्हा परिषद प्रशाला | १४ |
| ५] मंगरुळ | जिल्हा परिषद प्रशाला | १२ |
| | जिल्हा परिषद [ जि. प. ]प्राथमिक शाळा | ०४ |
| | इंदिरा कन्या प्रशाला | ०८ |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| शाळेचे नांव गावाचे | | शाळेचे नांव | शिक्षकसंख्या |
|---|---|---|---|
| ६] | काटगांव | जिल्हा परिषद प्रशाला | १५ |
| ७] | सलगर | जिल्हा परिषद. प्रशाला | १४ |
| ८] | जळकोट | कुलस्वामिनी पोस्ट बेसिक आश्रमशाळा | ०९ |
| | | जिल्हा परिषद प्रशाला | १४ |
| | | जिल्हा परिषद कन्या प्रशाला | ०६ |
| | | पार्वती कन्या प्रशाला | ०५ |
| ९] | जळकोटवाडी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०४ |
| | | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| | | इंदिरा काळे प्रशाला | ०५ |
| १०] | आरळी [बु] | जिल्हा परिषद शाळा | १३ |
| ११] | आरळी [खुर्द] | ~~जिल्हा~~ केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| १२] | नांदगाव | जिल्हा परिषद प्रशाला | १२ |
| १३] | नळदुर्ग | जिल्हा परिषद प्रशाला | २२ |
| | | अंजनी प्रशाला | ०९ |
| | | हुतात्मा बोरगावकर माध्यमिक शाळा | ०९ |
| | | धरित्री माध्यमिक शाळा | ०५ |
| | | पोस्ट बेसिक आश्रम शाळा | ०५ |
| | | धरित्री विद्या मंदिर | ०४ |
| | | नॅशनल मराठी प्राथमिक शाळा | ०४ |
| १४] | सिंदफळ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०४ |
| १५] | मसला | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०५ |
| | | शाहू महाराज विद्यालय | ०५ |
| १६] | ढेकरी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०४ |
| १७] | सांगवी मार्डि | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०३ |
| १८] | कात्री | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०१ |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| अ.क्र | गावाचे नांव | शाळेचे नांव | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| १९] | बोरी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०१ |
| २०] | शिरढोण | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०१ |
| २१] | अमरावतीवाडी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०१ |
| २२] | तीर्थ [बु.] | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०३ |
| | | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| | | महाराष्ट्र विद्यालय | ०५ |
| २३] | तीर्थ [खु.] | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०२ |
| २४] | देवसिंगा [तुळ] | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०३ |
| २५] | किसनवाडी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०४ |
| २६] | राखेल | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०१ |
| २७] | नांदुरी | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| | | वसंतराव गोपीनाथ पाटील शाळा | ०५ |
| २८] | कुंभारी | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| २९] | धोत्री | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ३०] | कताई | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ३१] | चव्हाणवाडी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०१ |
| ३२] | धनगरवाडी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०१ |
| ३३] | कदमवाडी | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०१ |
| ३४] | येवती | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| ३५] | चिवरी | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| | | दत्तू आण्णा पाटील माध्यमिक शाळा | ०५ |
| ३६] | उमरगा [चि] | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ३७] | हिप्परगा [ताउ] | केंद्र प्राथमिक शाळा | [illegible] |
| ३८] | हिप्परगा [रा] | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | ०२ |
| | | स्वामी रामानंद तीर्थ विद्यालय | ०४ |
| ३९] | आरळी [बु.] | केंद्र प्राथमिक शाळा | [illegible] |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| गावाचे नांव | शाळेचे नांव | शिक्षक संख्या |
|---|---|---|
| ४०] दिडेगाव | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ४१] चिंचोली | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ४२] काळेगांव | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ४३] किल्लज | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| ४४] गंधोरा | केंद्र प्राथमिक शाळा | ०५ |
| ४५] वडगाव [देव] | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| ४६] वाणेगाव | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ४७] केलवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ४८] बारूळ | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ४९] जवळगा [मे] | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ५०] उंदरगाव | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ५१] खंडाळा | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| ५२] वडगांव [लाख] | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| ५३] कार्ला | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ५४] तडवळा | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ५५] काळेकरवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ५६] होनाळा | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ५७] भोर्डा | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ५८] होर्टी | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| | लाल बहादूर शास्त्री विद्यालय | ०५ |
| ५९] चिकुद्रा | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| ६०] मुर्टा | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| ६१] मानमोडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ६२] बोरगाव | केंद्र प्राथमिक शाळा | [illegible] |
| | हुतात्मा बोरगावकर विद्यालय | [illegible] |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| गावाचे नांव | शाळेचे नांव | शिक्षक संख्या |
|---|---|---|
| ६३] हंगरगा [नळ] | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ६४] लोहगांव | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ६५] सलगरा [मड्डी] | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ६६] सिंदगाव | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ६७] बोळेगाव | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| | सिध्दरामेश्वर माध्यमिक विद्यालय | ०५ |
| ६८] अणदूर | जिल्हा परिषद कन्या प्रा. शाळा | ०४ |
| | जवाहर विद्यालय | ४० |
| ६९] खुदावाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०५ |
| | संत विनोबा भावे विद्यालय | ०५ |
| ७०] सराटी | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ७१] धनगरवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ७२] फुलवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ७३] इटकळ | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ७४] केसेगाव | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| | साने गुरुजी विद्यालय | ०५ |
| ७५] खानापुर | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ७६] बाभळगाव | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ७७] आरळी | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ७८] देवसिंगा [नळ] | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ७९] खडकी | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| ८०] मानेवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| गावाचे नांव | शाळेचे नांव | शिक्षक संख्या |
|---|---|---|
| ८१] हगलूर | हगलूरकेंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ८२] शहापूर | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| | छत्रपती शिवाजी विद्यालय | ०५ |
| ८३] निलेगांव | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ८४] बागदरी | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ८५] दहिटना | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ८६] गुळहळ्ळी | केंद्र प्राथमिक शाळा | ०४ |
| ८७] गुजनूर | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ८८] येडोळा | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ८९] दहिवडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| ९०] केमवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०२ |
| | मधुकर चव्हाण विद्यालय | ०५ |
| ९१] वाणेवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०१ |
| ९२] धुरतगांव | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ९३] तामलवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०६ |
| | सरस्वती विद्यालय | ११ |
| ९४] वडगाव [काटी] | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ९५] तांमवी [काटी] | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| ९६] पागधरवाडी | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| गावाचे नांव | शाळेचे नांव | शिक्षक संख्या |
|---|---|---|
| ९७] पिंपळा | केंद्र प्राथमिक शाळा | ०८ |
| | छत्रपती शिवाजी विद्यालय | ०५ |
| ९८] देवकुरुळी | केंद्र प्राथमिक शाळा | ०३ |
| | नरेंद्र बोरगावकर विद्यालय | ०५ |
| ९९] अपसिंगा | नरेंद्र आर्य विद्यालय | १२ |
| १००] काक्रंबा | संजीवनी विद्यालय | १२ |
| १०१] येवती | जिल्हा परिषद माध्यमिक शाळा | ०५ |
| १०२] हंगरगा [नळ] | राजीव गांधी विद्यालय | ०५ |
| १०३] किलज | सिद्धेश्वर विद्यालय | ०५ |
| १०४] गंधोरा | इंदिरा गांधी विद्यालय | ०५ |
| १०५] कार्ला | छत्रपती शिवाजी विद्यालय | ०५ |
| १०६] सलगरामड्डी [तुळ] | ज्ञानदिप विद्यालय | ०४ |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR